# डॉ. शिंदे अभियांत्रिकी-रोबोसॅप इनोव्हेशन यांच्यात सामंजस्य करार

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालय आणि रोबोसॅप इनोव्हेशन प्रा. लि. यांच्यात सामंजस्य करार झाला.

या करारानुसार विद्यार्थी, शिक्षक आणि रोबोसॅपचे कर्मचारी यांच्यासाठी तज्ज्ञांची व्याख्याने, तंत्रज्ञान, प्रशिक्षण कार्यशाळा, अभ्यास भेट, संसाधनांची देवाण-घेवाण, प्रायोजित प्रकल्प असे उपक्रम राबवले जातील. इच्छुक विद्यार्थ्यांना इंटर्नशिपद्वारे आवश्यक कौशल्ये विकसित करून त्यांची विविध ठिकाणी नियुक्ती केली जाईल, असे रोबोसॅपचे अध्यक्ष रोहित कदम यांनी सांगितले. तसेच या करारान्वये रोबोसॅप कर्मचाऱ्यांना आवश्यक तांत्रिक ज्ञान देण्यासाठी डॉ. ए. डी. शिंदे कॉलेजतर्फे प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केल्या जातील, असे प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी सांगितले. याप्रसंगी रोबोसॅपचे एम. डी. रोहित कदम, प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे, प्रा. महादेव बंदी व प्रा. इरफान त्रासगर उपस्थित होते. याकामी संस्थाध्यक्षा ऊर्मिला शिंदे, सचिव स्वाती कोरी, महेश कोरी यांचे प्रोत्साहन लाभले.



**भडगाव : डॉ. शिंदे अभियांत्रिकी व रोबोसॅप इनोव्हेशन यांच्यात सामंजस्य करारप्रसंगी रोहित कदम, डी. व्ही. घेवडे यांच्यासह अन्य.**



भडगाव : येथे शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालय आणि रोबोसॅप इनोव्हेशन प्रा. लि. यांच्यात सामंजस्य करारप्रसंगी उपस्थित मान्यवर.

# शिंदे महाविद्यालयात सामंजस्य करार

**गडहिंग्लज :** भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालय आणि रोबोसॅप इनोव्हेशन प्रा. लि. यांच्यात सामंजस्य करार झाला. या करारानुसार विद्यार्थी, शिक्षक आणि रोबोसॅपचे कर्मचारी यांच्यासाठी तज्ज्ञांची व्याख्याने, तंत्रज्ञान, प्रशिक्षण कार्यशाळा, अभ्यास भेट, संसाधनाची देवाण-घेवाण, प्रायोजित प्रकल्प, असे उपक्रम राबविले जाणार आहेत.

आवश्यक तांत्रिक ज्ञान देण्यासाठी डॉ. ए. डी. शिंदे कॉलेजतर्फे प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केल्या जातील, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी सांगितले. याकामी संस्थाध्यक्षा उर्मिला शिंदे, सचिव स्वाती कोरी, सल्लागार महेश कोरी यांचे प्रोत्साहन मिळाले. यावेळी प्रा. महादेव बंदी, प्रा. इरफान त्रासगर आदी उपस्थित होते.